महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार,
संकुल इमारत, १० वा मजला,
मुंबई-४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-२२६१७५१०/विस्तार- २२४/२३०. Email ID : arogya7-phd@mah.gov.in

क्रमांक :- संकिर्ण-१०२४ /प्र.क्र.५५६ /एनएचएम दिनांक : २८ /०५/२०२५

प्रति,

१. आयुक्त, आरोग्य सेवा
तथा अभियान संचालक ,राष्ट्रीय आरोग्य अभियान ,मुंबई.

२. संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई

३. संचालक-२, आरोग्य सेवा, पुणे.

४. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व जिल्हे)

**विषय -** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या विनंती बदल्याबाबत.

**संदर्भ:-** १.सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- बैठक-२८२३/ प्र.क्र २८/ आरोग्य-७ , दिनांक १०.१२.२०२४

२. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्रमांक:- संकिर्ण-१०२४/ प्र.क्र ५५६/ आरोग्य-७, दिनांक २१.१२.२०२४

३. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्रमांक:- संकिर्ण-१०२४/ प्र.क्र ५५६ (भाग-१)/ आरोग्य-७, दिनांक २१.१२.२०२४

४. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- संकिर्ण-१०२४/ प्र.क्र ५५६ /(ई-११२१३५३) एनएचएम, दिनांक २७.०५.२०२५

महोदय,

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या विनंती बदली संदर्भात दिनांक १०.१२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या विनंती बदली दिनांक २१.१२.२०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये करण्यात आल्या होत्या. तथापि, सदर बदली आदेशास त्याच दिवशी म्हणजे दि.२१.१२.२०२४ रोजी पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली होती.

०२. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या करण्यात आलेल्या विनंती बदलीचा आदेश संदर्भ क्र. ४ येथील दिनांक २७.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेला आहे. तसेच, दिनांक १०/१२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयात काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या विनंती बदल्याबाबत आता नव्याने संपुर्ण कार्यवाही करावयाची असल्याने समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आंतर जिल्हा बदली व जिल्हांतर्गत बदलीबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

अ) <u>आंतर जिल्हा बदलीबाबत :-</u>

१. आंतर जिल्हा विनंती बदलीबाबत संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई हे सक्षम प्राधिकारी राहतील. त्यांनी इच्छुक समुदाय आरोग्य अधिकारी यांच्याकडून बदल्याबाबत विनंती अर्ज मागवावेत.
२. दि.१२.०६.२०२५ पर्यंत नव्याने बदलीबाबत सर्व संबंधित समुदाय आरोग्य अधिकारी यांच्याकडून इच्छुकता मागविण्यात यावी.
३. सदर समुदाय आरोग्य अधिकारी यांची माहिती मागविताना बिंदुनामावली (सामाजिक आरक्षण) विचारात घ्यावे. जिल्ह्यातील समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकूण पदांच्या आरक्षणाबाबतचा समतोल राखण्यात यावा.
४. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांचे पती-पत्नी एकत्रिकरण धोरणानुसार, दुर्धर आजाराने कुटुंबातील व्यक्ती आजारी असल्यास त्यांना विनंतीनुसार बदली मध्ये प्राधान्य देण्यात यावे. अन्य अर्जदाराच्या बदल्याबाबत त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार कार्यवाही करण्यात यावी.
५. दि.१३.०६.२०२५ ते दि.२०.०६.२०२५ या कालावधीत समुपदेशनाने, बदलीने पदस्थापना देण्याची कार्यवाही करावी.
६. संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या स्तरावरून बदली करण्यात आलेल्या समुदाय आरोग्य अधिकारी यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी दि.०७.०७.२०२५ पर्यंत मुदत राहील. जे समुदाय आरोग्य अधिकारी दि.०७.०७.२०२५ पर्यंत बदलीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होणार नाहीत त्यांची बदली रद्द समजण्यात यावी.

ब) **<u>जिल्हांतर्गत बदलीबाबत</u>** :-

१. जिल्हांतर्गत विनंती बदली बाबत जिल्हा आरोग्य अधिकारी हे सक्षम प्राधिकारी राहतील. संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी इच्छुक समुदाय आरोग्य अधिकारी यांचेकडून विनंती बदलीबाबत अर्ज मागवावेत.

२. वरीलप्रमाणे आंतर जिल्हा बदलीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर दि.०८.०७.२०२५ पासून जिल्हांतर्गत बदलीसाठी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी बदलीसाठी इच्छुक असणा-या समुदाय आरोग्य अधिकारी यांची समुपदेशनाने बदली करावी.

३. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांचे पती-पत्नी एकत्रिकरण धोरणानुसार, दुर्धर आजाराने कुटुंबातील व्यक्ती आजारी असल्यास त्यांना विनंतीनुसार बदली मध्ये प्राधान्य देण्यात यावे. अन्य अर्जदाराच्या बदल्याबाबत त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दि.११.०७.२०२५ पर्यंत समुपदेशनाने बदल्या करण्यात याव्यात.

५. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेस्तरावरून करण्यात आलेल्या बदल्या संदर्भात समुदाय आरोग्य अधिकारी यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी दि.१८.०७.२०२५ पर्यंत मुदत राहील. जे समुदाय आरोग्य अधिकारी दि.१८.०७.२०२५ पर्यंत बदलीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होणार नाहीत त्यांची बदली रद्द समजण्यात यावी.

क) आंतर जिल्हा तसेच जिल्हांतर्गत बदलीसाठी एकाच वेळी इच्छुकता मागवावी, आंतर जिल्हा बदली झाल्यानंतर जिल्हांतर्गत बदलीसाठी समुपदेशनाची कार्यवाही करावी.

ड) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या विनंतीनुसार प्राप्त बदलीच्या अर्जाची छाननी आंतर जिल्हा बदलीसाठी संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई व जिल्हांतर्गत बदल्यांसाठी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी करावी.

ई) वरील प्रमाणे समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदल्या करताना आदिवासी व दुर्गम भागात ज्यांची बदली होईल त्यांना अगोदर रुजू करुन घ्यावे. तदनंतर आदिवासी दुर्गम भागातून ज्यांची इतरत्र बदली झालेली आहे त्यांना कार्यमुक्त करावे. **तसेच आदिवासी व दुर्गम भागात सद्यस्थितीत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांची जागा रिक्त राहणार नाही याची काळजी घ्यावी.**

२८/०५/२०२५

(अनिल वि.सावरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

(१) संचालक, (शहरे), आरोग्य सेवा, मुंबई
(२) उपसंचालक, आरोग्य सेवा, (सर्व परिमंडळे)
(३) जिल्हा शल्य चिकित्सक, (सर्व जिल्हे)
(४) निवडनस्ती (एनएचएम-कार्यासन)